# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

**परिपत्रक क्र. - ६२/२०१८**

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी (बायो./इन्टर./ई.सी.एस) या सर्व संलग्नित पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील मा.प्राचार्य/प्राचार्या यांना या परिपत्रकाद्वारे आदेशान्वये कळविण्यात येते की, शै.वर्ष २०१८-१९ मधील ऑक्टो/नोव्हें-२०१८ या परीक्षा हंगामापासून बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी (बायो./इन्टर./ई.सी.एस) या अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या (सत्र १ व २) परीक्षा व मुल्यमापनाचे कामकाज महाविद्यालयीन स्तरावर करण्याबाबत विद्या परिषदेच्या दि.२१/०६/२०१८ रोजीच्या विषय क्र.९३(२५) नुसार खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

| | |
|---|---|
| **ठराव :** | मा. राजेश अग्रवाल समितीने केलेली शिफारस क्र. R.19 Decentralization of Examination Activities नुसार पदवी अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या (सत्र १ व २) कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे कामकाज महाविद्यालयीन स्तरावर सोपविण्यास मान्यता देण्यात आली. |

वरील ठरावान्वये मूल्यमापनाचे कामकाज महाविद्यालयीन स्तरावर करण्यात येणार असल्याने संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षा हया महाविद्यालयामध्ये घ्यावयाचे आहेत. त्यानुसार परीक्षेचे आयोजन वेळापत्रकानुसार करुन परीक्षा निकोप वातावरणात पार पाडून त्याचे मूल्यमापनाचे कामकाज विहित मूदतीत पूर्ण करावे.

मा.प्राचार्य/प्राचार्या यांनी या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींची अत्यंत काटेकोरपणे नोंद घेऊन सदरची बाब विद्यार्थी, शिक्षक व परीक्षेशी निगडीत सर्व घटकाच्या निदर्शनास आणून देवून परीक्षेच्या कामात विद्यापीठास सहकार्य करावे.

उपकुलसचिव
परीक्षा व मूल्यमापन विभाग

संदर्भ क्रं. : सोविसो/परीक्षा/वेळापत्रक/२०१८/ 2154

दिनांक : 11 SEP 2018